# चित्रपट परीक्षणातील गमतीजमतींचा उलगडा

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

चित्रपटगृहात प्रदर्शित होणारा चित्रपट, चित्रपटाच्या परीक्षणासाठी तो पाहायला जाणारे विविध वृत्तपत्रांचे पत्रकार, कधी कधी निर्मात्यांकडून त्यांना चित्रपट पाहण्याचे मिळणारे आमंत्रण, त्यानंतर प्रत्यक्ष वृत्तपत्रांत छापून येणारे परीक्षण आणि त्यावर प्रेक्षक व चित्रपट निर्मात्यांची मिळणारी प्रतिक्रिया... या चित्रपट प्रदर्शनापासून वृत्तपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या परीक्षणापर्यंतच्या प्रवासातील अनेक गमतीजमतींचा उलगडा चित्रपट परीक्षणकर्त्यांनी शुक्रवारी केला.

'महाराष्ट्र टाइम्स'च्या पुणे आवृत्तीचे सहवृत्तसंपादक श्रीपाद ब्रह्मे यांच्या 'फर्स्ट डे फर्स्ट शो' या पुस्तकाचे प्रकाशन विविध वृत्तपत्रांत चित्रपटाचे परीक्षण लिहिणाऱ्या पत्रकारांच्या हस्ते झाले. या वेळी अभिजित थिटे, जयदीप पाठकजी, अभिजित पेंढारकर, महेश बर्दापूरकर, मंदार कुलकर्णी आणि ब्रह्मे यांनी त्यांचे चित्रपट परीक्षणाचे अनुभव कथन केले. स्नेहल दामले यांनी त्यांच्याशी संवाद साधला. चपराक प्रकाशनचे घनश्याम पाटील, 'बुकगंगा डॉट कॉम'चे मंदार जोगळेकर आदी या वेळी उपस्थित होते.




**श्रीपाद ब्रह्मे यांच्या 'फर्स्ट डे फर्स्ट शो'चे प्रकाशन**

'आपल्याकडे सिनेमाचे परीक्षण केले जाते. मात्र, ते साहित्य पुस्तक स्वरूपात आणले जात नाही. एकूण आपल्याकडे कोणत्याही गोष्टीचे डॉक्युमेन्टेशन करण्याचे प्रमाण कमी आहे. भविष्यात संदर्भासाठी डॉक्युमेन्टेशन करणे गरजेचे आहे. शोले चित्रपट खूप गाजला; पण त्या वेळी वृत्तपत्रांच्या चित्रपट परीक्षकांनी त्यावर खूप टीका केली होती. ते आज वाचायला मिळत नाही. त्यामुळे अशा प्रकारचे डॉक्युमेन्टेशन करणे गरजेचे आहे,' असे मत ब्रह्मे यांनी व्यक्त केले. निर्माता, दिग्दर्शक, कलाकार मनातला सिनेमा पडद्यावर उतरविण्याचा प्रयत्न करतात आणि चित्रपट परीक्षक एक प्रेक्षक म्हणून चित्रपट पाहतो, असे पेंढारकर यांनी सांगितले. तर, एकाच चित्रपटाबाबत प्रत्येकाचा अनुभव वेगळा असू शकतो, असे थिटे म्हणाले.